## प्रकरण पाचवे

## विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे काव्यविषयक विवेचन

### प्रास्ताविक:

अव्वल इंग्रजीतील गद्य हे अनुवाद, अनुकरण आणि आत्मप्रत्यय या पाय-यावरून उतरताना दिसते. व त्यातूनच पुढे मराठी निबंधाचा उदय झाला. श्रीमती फेरार, रामकृष्ण विश्वनाथ, लोकहितवादी, बाबा पद्मनजी, विष्णु-बुवा ब्रह्मचारी व गो.ना. माडगांवकर हे अव्वल इंग्रजीतील प्रमुख निबंधकार होत. यातुनच पुढे वाङ्मयीन जाणिवेने निबंधलेखन करणारा मालाकार प्रकट झाला. तेव्हा विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या वाङ्मयीन कामगिरीकडे वळण्यापूर्वी त्यांचा स्थूल समात जीवन परिचय बघणे इष्ट होईल.

### स्थूल समात जीवन परिचय:

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा जन्म २० मे १८५० रोजी पुण्यामध्ये झाला. लहानपणी त्यांची अभ्यासाची तयारी आजोबा हरिपंत यांनी करवून घेतली. मराठी शाळेतील शिक्षण पूर्ण केल्यानंतर १८६१ मध्ये चिपळूणकर पूना हायस्कूलमध्ये चौथ्या इयत्तेत दाखल झाले. बालपणी

संध्या, पूजा इत्यादी ब्रह्मकर्माचे शिक्षण, वेदांचे पठण, या गोष्टीही त्यांच्या आजोबांनी चिपळूणकरांकडून करवून घेतलेल्या होत्या. त्याचप्रमाणे हायस्कूलमध्ये असताना कृष्णशास्त्री वैजापूर यांच्याकडे ते संस्कृत शिकायला जात होते. एकंदरित लहानपणापासूनच इंग्रजी आणि संस्कृत विषयांचे अध्ययन चिपळूणकरांनी सुरु केले होते.

१८६५ साली त्यांचा विवाह झाला आणि १८६६ साली ते पूना कॉलेजमध्ये दाखल झाले. प्रपंच आणि अध्ययन यांचा प्रवास एकाचवेळी सुरु केला. १८७१ साली एकीकडे बी.ए.चा अभ्यास तर दुसरीकडे बाबा गोखले यांच्या खाजगी शाळेत ते शिक्षकाचे काम करीत होते. बी.ए. झाल्यानंतर एल्. एल्.बी. च्या किंवा मुलकीच्या परीक्षेस बसण्याचा त्यावेळच्या सुशिक्षितांनी हाताळलेला मार्ग खुला असूनही त्यांनी तो अनुसरला नाही. कारण ग्रंथाध्ययन व ग्रंथरचना यातच आपले सारे आयुष्य घालवावयाचे असे विचार त्यांच्या मनात घोळत होते. चिपळूणकरांच्या कॉलेज जीवनामध्ये डॉ. वर्डस्वर्थ, डॉ.किलहॉर्न, प्रो. केरोपंत छत्रे ही नामांकित मंडळी चिपळूणकरांना अध्यापक म्हणून लाभलेली होती. विष्णुशास्त्र्यांनी कॉलेजजीवनातच संस्कृत, इंग्रजी, मराठी, इतिहास या विषयावर बरेच वाचन केले होते. अशा विशिष्ट वातावरणात त्यांच्याव्यक्तिमत्वाची जडण-घडण होत होती. त्यांच्या "निबंधमाले"ची प्रेरणा इंग्रजी वाङ्‌मयीन चळवळीत आढळते. याबाबतीत सुधाकर देशपांडे म्हणतात, "चिपळूणकरांचे चोवीस वर्षाचे वय, त्यांनी "निबंधमाले"चे सांगितलेले उद्‌देश, मेकॉले या त्यांच्या आवडत्या लेखकाने "एडिंबरो रिव्ह्यू"तून केलेले लेखन हे सारे लक्षात घेता चिपळूणकरांनी इंग्लिश नियतकालिकांतून प्रेरणा घेतली. या अनुमानास बळकटी येते. चिपळूणकरांचे वाङ्‌मयीन व्यक्तित्व, जिला ते "वाघिणीचे दूध" म्हणत त्या इंग्रजी भाषेवरच परिपुष्ठ झालेले होते."[१]

चिपळुणकरांची वाङ्मयीन कामगिरी:

विष्णुशास्त्रींनी १८६८ पासून "शालापत्रक" मध्ये लिखानास प्रारंभ केला. आणि कृष्णाशास्त्रींनी संपूर्ण मासिकाची जबाबदारीच त्यांचेवर सोपविली. विष्णुशास्त्रीनी संस्कृत कवीवरील लेखमालेस प्रारंभ केला. १८७३ च्या प्रारंभी विद्याखात्याचे डायरेक्टर चॅटफील्ड यांच्या शिफारशीवरून विष्णुशास्त्रांची सरकारी हायस्कूलमध्ये नेमणूक करण्यात आली व त्यांनी व्यावसायिक जीवनाच्या क्षेत्रात पदार्पण केले. १८७४ साली जानेवारीमध्ये "निबंधमाले"चा पहिला अंक बाहेर पडला. पुढे १८७५ साठी विष्णुशास्त्रींनी मराठी कवितेवर लिहिलेल्या निबंधातील मिशनऱ्यांवरील टीका व सरकारी धोरणावर झाडलेले ताशेरे यांचे निमित्य होऊन "शाला पत्रक" बंद पडले. १८७० मध्येच चिपळूणकरांची रत्नागिरी येथे बदली करण्यात आली होती. स्थलांतरामुळे "निबंधमालेत" व्यत्यय येऊ शकेल अशी बदली करणाऱ्या अधिकाऱ्यांची अपेक्षा होती. पण चिपळुणकरांनी ती फोल ठरविली. कारण रत्नागिरीहूनही त्यांनी "निबंधमाले"च्या संपादनाचे कार्य चालूच ठेवले.

१८७८ साली मे महिण्यात कृष्णाशास्त्री चिपळूणकरांचा ह्रदयविकारामुळे मृत्यू झाला. यावेळी नोकरी सोडण्याचे विचार विष्णुशास्त्रींच्या मनात घोळत होते. तसेच स्वतंत्र व्यवसाय करून देशसेवा करण्याचे विचारही बळावत चालले होते. यापूर्वी विष्णुशास्त्री यांच्या प्रेरणेने १८७७ साली "चित्रशाळा" स्थापन झाली होती. १८७८ च्या जानेवारीपासून "काव्येतिहाससंग्रह" हे मासिकही निघू लागले होते. कृष्णाशास्त्रींच्या अकस्मात निधनामुळे त्यांच्या प्रतिकूल अभिप्रायाचे बंधनही संपले आणि देशसेवा करण्याचे विचार बळावले व एकदिवस विष्णुशास्त्रींनी नोकरीचा राजीनामा दिला. ग्रंथाध्ययन, ग्रंथरचना

करण्यात आपले आयुष्य घालवावयाचे असे जे चिपळूणकरांचे विचार होते त्यांना मूर्त स्वरूप प्राप्त झाले.

या सुमारास "चित्रशाळा" चांगली चालु लागली होती. व जुलै महिन्यात "किताबखाना" नावाचे पुस्तकाचे दुकानही त्यांनी भागीदारीत काढले होते. रत्नागिरीहून आल्यानंतर विष्णुशास्त्रींना आयुष्याची फक्त तीनच वर्षे लाभली. पूर्वी सुरु केलेल्या उद्योगांची व्यवस्था लावीत असता नवीन शाळा काढण्याचा त्यांचा विचार बळावला. टिळक, आगरकरांसारख्या तरुणांनी एकत्र येऊन १ जानेवारी १८८० रोजी "न्यू इंग्लिश स्कूल"ची स्थापना केली. याच उपक्रमातून "केसरी" व "मराठा" ही वृतपत्रे उदयास आली. "आर्यभूषण" छापखानाही निघाला. ४ जानेवारी १८८१ मध्ये केसरीचा पहिला अंक निघाला. ही वृत्तपत्रेदेखील राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन उदयास आलेली होती. "आर्यभूषण", "चित्रशाळा", "किताबखाना" या उद्योगसंस्थांच्या स्थापनेमागेही चिपळूणकरांची भूमिका राष्ट्रीयवृत्ती जागृत करण्याची आहे. यानंतर "निबंधमालेची समाप्ती करुन साधार, सखोल, विवेचन करणाऱ्या ग्रंथमालेकडे वाटचाल करण्याचा संकल्प त्यांच्या मनात घोळत होता. परंतु १७ मार्च १८८२ रोजी अनपेक्षितपणे त्यांचा मृत्यू घडून आला. चिपळूणकरांची ऐन तारुण्यातील कर्तृत्वाची झेप, वाङ्‌मयक्षेत्रामध्ये अल्पकाळामध्ये मारलेली गगनभरारी काळाने खंडित केली.

माणूस संपतो पण त्याचे विचार कधी संपत नाहीत. त्याप्रमाणे चिपळूणकरांचे लौकिक जीवन जरी संपले असले तरी त्यांच्या साहित्य विचाराद्वारे चिपळूणकर अमर राहिले आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनामध्ये चिपळूणकरांनी क्रांती केली हे नाकारणे

कठीण आहे. काही माणसे मरणानंतरही आपल्या कर्तृत्वाने जिवंत रहातात. त्यापैकी चिपळूणकर हे एक होत. तेव्हा त्यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व कसे होते हे पहाणे गरजेचे आहे.

## चिपळूणकरांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व:

कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व जेव्हा घडले जाते, तेंव्हा तिचा विशिष्ट पिंड आणि तिच्या भोवतालची परिस्थिती यांच्या क्रिया-प्रतिक्रियांनीच आकार घेत असते. इंग्रजांच्या सुव्यवस्थित कारभारामुळे त्यांच्या शास्त्रीय ज्ञानामुळे व सामर्थ्यामुळे प्रथमत: एतद्देशीय दिपले गेले. आणि त्यांच्या मनामध्ये एकप्रकारचा न्युनगंडही निर्माण झाला. काहींना असे वाटू लागले की आपणाला सुधारण्यासाठी इंग्रजांसारखे गुरु परमेश्वराने पाठविले आहेत. आपण ज्ञानसंपन्न झालो की इंग्रज आपले राज्य आपणास परत देतील. परंतु पुढे इंग्रजांची नीती स्पष्ट होऊन या समजुतीला तडे गेले. इंग्रजांकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलू लागला. साहजिकच या बदलत्या काळाचे संस्कार विष्णुशास्त्रींच्या मनावर झालेत.

मराठी भाषेची व वाङ्‌मयाची स्थिती पाहता. विद्यापीठाचे व ब्रिटिश सरकारचे धोरण सहानुभूतिशून्य व प्रतिकूल होते. त्यामुळे भाषा व वाङ्‌मय यांच्या प्रगतीला अडथळा निर्माण झाल्याचे दिसते. १८५७ साली मुंबई विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठाने मराठी विषयीचे सहानुभूतीचे धोरण १८७० नंतर बंद केले. मराठी माध्यमालाच नव्हे तर मराठी विषयालाही स्थान उरले नव्हते. तत्कालीन सुशिक्षित लोकांमध्ये मराठीविषयी कमालीची अनास्था निर्माण झाली. फक्त "विविधज्ञानविस्तार" सारख्या मासिकांनीच अशावेळी भाषा व वाङ्‌मय यांच्या अभिवृध्दीकडे लक्ष देण्याचे कार्य स्वीकारलेले होते.

एकंदरित स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा या तिन्ही क्षेत्रातील परिस्थिती भारतीयांच्या स्वत्त्वावर आघात करणारी होती. अशावेळी महाराष्ट्रातील समाजाची अस्मिता जागृत करून या परिस्थितीला शह देण्याचे प्रबळ कार्य विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केले.

चिपळूणकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू दिसून येतात. त्यांच्या निबंधमालेतील निबंध हे त्यांच्या रसरसत्या देशाभिमानाचा प्रत्यय देतात. उदा. "इतिहास" हा निबंध "इंग्रजी भाषा" (अंक ३०) हे दोन निबंध तर चिपळूणकरांच्या धगधगीत देशाभिमानाची साक्ष देतात. देशाभिमानाप्रमाणेच चिपळूणकरांच्या मनामध्ये पूर्वगौरव ओतप्रोत भरलेला दिसून येतो. मेकॉले, मिल्ल, ख्रिस्ती मिशनरी यांनी भारतीयांना नेहमीच तुच्छ लेखले. त्यांचा प्रतिवाद करताना चिपळूणकरांच्या लेखणीस विलक्षण धार येते.

पूर्वजांच्या गौरवामध्ये रंगणारे हे मन साहजिकच भूतकाळातही रमलेले दिसते. भोवतालच्या समाजामध्ये चिपळूणकरांना स्थितीशीलपणा दिसून येतो. जुनी युध्दे, पराक्रम त्यांच्या मनाला स्फूर्ती देतात. "इतिहास" हा त्यांच्या आवडीचा विषय हे त्यांच्या कांही निबंधावरून दिसून येते. उदा. "आमच्या देशाची स्थिती".

इतिहासापासून स्फूर्ती घेणा-या,त्यात रमणा-या चिपळूणकरांच्या मनाला वर्तमानकालीन परिस्थिती मात्र समाधानकारक वाटत नाही. पिढयान्‌पिढया परचक्राचे भय असल्यामुळे स्वस्थपणे ऐषारामात रंगलेले संस्थानिक पाहून चिपळूणकरांना खंत वाटते.

"निबंधमाले"च्या वर्षाअखेरीच्या अंकात चिपळूणकर परमेश्वरी शक्तीचे आभार मानतात. यावरून असे दिसते की चिपळूणकर श्रध्दाळु व आस्तिक वृत्तीचे

होते. चिपळूणकरांच्याकाळी हर्बर्ट स्पेन्सरच्या अज्ञेयवादी विचारसरणीचा पगडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर फार असे. "आम्हाला असे वाटते की, धर्मसंबंधाने सगळेच अंध होत. किंवा सगळेच धर्म मृगजळाप्रमाणे ज्याला त्याला चकवितात."[२] (केसरी- २२ मार्च १८८१).

चिपळूणकर चातुर्वर्ण्याचे अभिमानी आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तोलबिंदू स्वाभिमान हाच आहे. हा ब्राह्मणाबद्दल असणारा अभिमान प्रतिक्रिया म्हणून काही वेळा उग्र व कडवट स्वरूपात प्रकट होतो.

"निबंधमाले"मध्ये चिपळूणकरांनी जोतीबांविषयी कडक प्रतिक्रिया व्यक्त केली असली तरी वृत्ती शांत झाल्यावर "शूद्र देशबंधू"च्या दु:खाची त्यांनी दखल घेतली असून ती नाहिशी करणे हे देशहिताचे कर्तव्य आहे असे चिपळूणकरांनी म्हटले आहे. विधवांच्या करूण स्थितीने त्यांचे अंत:करण किती व्यथित होत असे हे त्यांच्याच "लोकभ्रम" या निबंधातून प्रकट होते.

स्वाभिमान व आत्मप्रत्यय या संकल्पनेतून चिपळूणकरांच्या राजकीय मताचा शोध घेता येईल. आपल्या देशाच्या विपत्तीचे मुख्य कारण पारतंत्र्य हेच आहे असे चिपळूणकरांनी ठासून सांगितलेले आहे. आपण पूर्वी पराक्रम गाजविले, मोठमोठी राज्ये, स्थापन केली, कलाकौशल्ये दाखविली ते इंग्रजांच्या जीवावर नव्हे. इंग्रजांचे खरे स्वरूप दाखवून देताना ते म्हणतात, "इंग्रज हे प्रजारक्षक नव्हते तर ते प्रजाभक्षक आहेत." म्हणूनच महाराष्ट्रातील उग्र जहाल राजकारणी व्यक्तींनी चिपळूणकरांपासून स्फूर्ती घेतली ती उगीच नव्हे.

चिपळुणकरांची वाङ्मयनिर्मिती:
========================

चिपळूणकरांचे व्यक्तिमत्व हे मूलत: वाङ्मयप्रेमी आणि रसिक आहे. "

"शालापत्रका"तून त्यांनी "कविता" या विषयावर लेख लिहिले आहेत. काही ग्रंथावर अभिप्रायही दिले आहेत. "निबंधमाले"तही केव्हाकेव्ही त्यांनी कांही साहित्यविचार प्रकट केले आहेत. निबंधमालेच्या मागे चिपळूणकरांची ज्ञानदानाची जाणीव दिसुन येते. ते म्हणातात, "प्रस्तुत निबंधानी अशा दुसऱ्या लोकांस की ज्यास विद्यालयातील शिक्षणाचा वगैरे लाभ न घडल्याने ज्ञानाचा मार्ग खुला नाही. त्यास अनेक गोष्टीचे ज्ञान व्हावे हा एक ते लिहिण्याचा उद्देश आहे."[३]

चिपळूणकरांचे व्यक्तिमत्व जे "माले"तून सतत प्रकट होते, ते येथेही व्यक्त झाल्यावाचून रहात नाही. ते या संदर्भात लिहितात, "काय करावे, आमचे लोक बुध्दीने मंद नाहीत हो, फक्त त्यांच्यासाठी ज्ञानप्रसाराच्या सोयीच नाहीत. "चलाखपणात आम्ही कोणत्याही लोकास हार जाणार नाही, अशी आमची खात्री आहे, आमच्या बुध्दीचे प्रभाव जगाच्या इतिहासावर अक्षय खोदलेले आहेत, व चंद्रसूर्य आहेत तोवर त्यांचा झेंडा मिरवत राहील."[४] अशा आपल्या देशबांधवांनी मागासलेले राहू नये असे चिपळूणकरांना वाटले. त्यांना ज्ञानदान करावे या उद्देशाने त्यांनी निबंधमाला काढली. त्यांच्यापुढे बेकन, स्टील, ॲडिसन, डॉ. जॉन्सन, मेकॉले यांचा आदर्श होता. निबंधमाला म्हणजे चिपळूणकरांचे वाङ्‌मयीन रूप म्हणता येईल.

निबंधमालेतील निबंधाचे वर्गीकरण केल्यास ते पुढीलप्रमाणे होईल. निबंधमालेमध्ये राजकीय, सामाजिक व वाङ्‌मयीन विषयावरील निबंध दिसून येतात. "इतिहास", "आमच्या देशाची स्थिती", हे निबंध राजकीय निबंध या सदरामध्ये मोडतात. तर "संपत्तीचा उपयोग", "लोकभ्रम" हे निबंध सामाजिक गोष्टीवर प्रकाशझोत टाकतात. "कर्तृत्व", "वाचन", विद्वत्त्व

आणि कवित्व" हे निबंध तर चिपळूणकरांच्या वाङ्‌मयीन जाण असणाऱ्या रसिकतेची साक्ष देतात.

संस्कृत कविपंचक:
============

चिपळुणाकर बी.ए. च्या वर्गात शिकत असताना म्हणजे १८६८ मध्ये "शालापत्रकां"तून लिहू लागले होते. शेवटची चार वर्षे तर विष्णुशास्त्रीनीच हे मासिक चालविले. "निबंधमाला" सुरू होईपर्यंत चिपळूणकरांना आपली मते मांडण्यासाठी तसेच लिहिण्याचा सराव करण्यास "शालापत्रक" हे मासिक उपलब्ध होते. १८७२ मधील मे पासून "शालापत्रका"त कालिदास, बाण, सुबन्धु आणि दण्डी या संस्कृत कविपंचकावर लेख लिहिले.

काव्यविवेचनपर ग्रंथांची आवश्यकता:
==========================

चिपळूणकरांची भूमिका ही वाङ्‌मयक्षेत्रातील टीकाकारांची आहे. चिपळूणकरांनी स्फूट व दीर्घ दोन्ही प्रकारचे टीकालेखन केले. ते पुढील नियतकालिकांतून प्रसिध्द झालेले आहे.

| | |
|---|---|
| १. शालापत्रक | (१८६१) |
| २. ज्ञानप्रकाश | (२६ ऑगस्ट १८४९) |
| ३. निबंधमाला | (इ.स. १८७४) |
| ४. केसरी | (इ.स. १८८१) |

या नियतकालिकांतून एकूण २५ पुस्तकावर चिपळूणकरांनी स्फुट टीकालेख लिहिले आहेत. चिपळुणाकरांच्या व्यक्तिमत्त्वात क्रांतिवृत्ती दिसून येते. तसेच सत्यप्रकटनासाठी आवश्यक वाटले तर परखडपणे दोष दाखवावेत, त्यात काही चूक नाही पण घरगुती गोष्टी, उणीदुणी काढू नयेत हे पथ्य पाळावे असे

असे चिपळूणकरांना वाटते. यावरून चिपळूणकरांच्या विचारांची खोली कळू. येते. तसेच त्यांची विवेकदृष्टीही दिसून येते. चिपळूणकरांच्या ठिकाणी जशी क्रांतिवृत्ती दिसून येते तसेच परंपराभिमानही दिसून येतो. "वाचन" या निबंधात ते जुन्या शिक्षणपध्दतीला "संकुचित", "त-हेवाईक" म्हणतात. पण या जुन्या परंपरांना न दुखवता ते त्याची स्तुतीही करतात, या जुन्या शिक्षणपध्दतीत ठामपणा, विद्यामुखोद्गत करण्याचे सामर्थ्य आहे. असे तिचे समर्थन करतात. लहानपणापासूनच चिपळूणकरांच्यावर संस्कृतचा प्रभाव पडलेला असल्यामुळे गुण-दोषाचे समर्थन केले आहे.

इंग्रजीमध्ये काव्यविवेचन शास्त्रावर उत्तम ग्रंथ आहेत. असे संस्कृत, मराठी, भाषेत नाहीत. काव्यविवेचनशास्त्रात काव्याचे स्वरूप कवीचे गुण, कवित्व ईश्वरी देणगी आहे काय ? इत्यादी गोष्टींचा परामर्श घेतलेला असतो, असे चिपळूणकर तशा ग्रंथाची आवश्यकता पटवून देतात. मराठीतील साहित्य-शास्त्राने संस्कृत साहित्यशास्त्राचे पूर्णपणे अनुकरण करण्याचे कारण नाही. योग्य व आवश्यक वाटेल तेथे त्याने आपला स्वतंत्र मार्ग चोखाळावा असा चिप-ळूणकर सल्लाही देतात.

## काव्य व शास्त्र यातील भेद:

काव्याचा शास्त्रापासून वेगळेपणाही चिपळूणकरांनी लक्षात घेतलेला आहे. कविता ही प्रामुख्याने छंदोबध्द असते. तर शास्त्र नेहमी गद्यस्पानेच लिहिलेले असते. त्यातील विषय अत्यंत दुर्बोध असतो. शास्त्रीय विषय समजण्यास सत्यासत्यविवेचक शक्ती असावी लागते तर कविता समजण्यास मुख्यत: कल्पकपणाच असावा लागतो. असा काव्य व शास्त्र यातील भेद "शाला-पत्रका"तील "कविता" या निबंधात चिपळूणकरांनी दाखविला आहे. "विद्वत्व आणि कवित्व" या निबंधात काव्य व शास्त्र यांची प्रयोजनेच भिन्न असतात, यावर चिपळूणकरांनी भर दिलेला आहे. "कविता" मनाचे रंजन करते आणि

मनास शांती देते", तर शास्त्रामुळे "मनास प्रगल्भता येते. त्याचे रंजन होत नाही शास्त्राची प्रगती झाली असता काव्यप्रतिभा क्षीण होते," असे प्रतिपादन चिपळूणकरांनी केले आहे.

परंतु आपणास असे दिसून येते की, गेल्या शंभर वर्षात वैज्ञानिक शोध इतके लागले आहेत भौतिक क्षेत्रामध्ये आश्चर्यकारक प्रगती केलेली आढळते. त्यामुळे काव्याची पीछेहाट तर झालीच नाही उलट नवे ज्ञान आत्मसात करून काव्य हे नव्या नव्या जाणिवा आविष्कृत करीत आहे. नवे नवे विषय पहावयाला मिळतात. त्यामुळे मेकॉलेच्या मताच्या आधारे आपले मत मांडणाऱ्या चिपळूणकरांचे म्हणणे ग्राह्य वाटत नाही.

चिपळूणकरांच्या काव्यविचारांतील विवेचनाचा ग्राह्य भाग एवढाच की जड, तर्क, कठोर, रुक्ष, पुस्तकी पांडित्य कवित्वाला प्रतिकूल आहे. काव्य हे जिवंत अनुभूतीतून निर्माण होते. विद्वत्तेच्या जोरावर रसिकतेच्या अभावी काव्यास्वाद घेता येणार नाही.

## काव्याचे स्वरूप:

काव्यलक्षण सांगावयाचे म्हणजे काव्याचे बाह्यरूप आणि त्याचे अंतरंग या दोहोंचाही शोध घ्यावयास हवा. म्हणजे आपल्या त्या वस्तुचे बाह्यरूप झटकन् कळून त्यातील मूलभूत तत्वाचीही कल्पना येईल व व्याख्येचे उद्दिष्ट साधेल. या दृष्टीने विश्वनाथाची व्याख्या सुटसुटीत व आवश्यक घटकांचा उल्लेख करणारी झाली. आहे. "काव्य म्हणजे रसात्मक वाक्यं" असे तो म्हणतो. चिपळूणकरांनीदेखील काव्यलक्षण सांगताना "रसात्मकं काव्यम" हे लक्षण मुख्य मानले गेले आहे. असे सांगून यमक, अनुप्रास, श्लेष, वर्णमाधुर्य

ही आवश्यक आहेत असे नाही. हे चिपळूणकर स्पष्ट करतात. "विद्वत्व आणि कवित्व" या निबंधात काव्यलक्षण सांगताना चिपळुणकर म्हणतात, "काव्याचे बरोबर थोडक्यात लक्षण देणे फार कठीण आहे. ते इंग्रज ग्रंथकारांनी पाच पंचवीस प्रकारांनी दिले आहे. तरी आपल्या संस्कृत ग्रंथातील "रसात्मकं काव्यम्" म्हणजे "रसयुक्त ते काव्य" हे लक्षण सध्या तरी आपणास पुरे आहे हे लक्षण ध्यानात धरले असता वरील सर्व भ्रांती दूर होतील. म्हणजे काव्यास पद्यरचना, चमक, प्रास, श्लेष, किंबहुना वर्णमाधुर्यही आवश्य हवीच असा काही नेम नाही" यासाठी चिपळुणकरांनी बालमित्र मधील उदाहरण दिलेले आहे.

कवित्वाला सहृदयता आवश्यक आहे. शृंगार-वीर-करुणादी नानाविध वृत्ती त्यास अत्यंत सूक्ष्मत्वाने स्पष्टपणे जाणवल्या पाहिजेत. वरील निरनिराळ्या वृत्तींचा विषय इंद्रियगोचर होताच कवीचे मन क्षुब्ध होऊन जाते. त्याच्या भावनांचा उत्स्फूर्तपणे आविष्कार होतो. तीच खरी अस्सल कविता होय. असे चिपळुणकर म्हणतात. आपल्या मनाला पुरावा म्हणून आद्यकवीचा क्रौंचवध निमित्तक करुणोद्गार" ते देतात. व विद्वत्व आणि कवित्व या निबंधाच्या तळटीपेत वर्डस्वर्थची "Poetry is the spontaneous overflow of powerful feelings."[3] ही व्याख्या देतात.

काव्याचे विषय पाहिले तर ते प्राय: संसारातील अनेकविध प्रसंग सामान्यत: दृष्टीस पडणारे सृष्टीतील चमत्कार असेच असतात. त्याचे हुबेहुब वर्णन करणे हे काही तितके अवघड नाही. त्यामुळे अनेक कवी या विषयावर रचना करताना दिसतात, असे चिपळूणकर सांगतात. अनुभवलेल्या गोष्टीचे वर्णन करणे तादृश्य कठीण नाही. मात्र जेथे केवळ मनालाच शिरकाव होतो.

अशी इंद्रियातीत अद्भुत काल्पनिक सृष्टी, त्यामध्ये यथेच्छ विहार करणे हे फक्त शेक्सपिअर, कालिदास या श्रेष्ठ साहित्यीकांनाच शक्य होते, असे सांगून खरे कवित्व दुर्मीळ असते हे स्पष्ट केले आहे. याबाबतीत गोपाळ वामन बापट यांचे काव्याबद्दलचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, "जगात कोटयावधी माणसे जन्मास येतात व त्यांच्या आयुष्यमर्यादेत वेगवेगळे व्यवहार करून हे जग सोडतात. पण या कोटयावधी माणसांत एखादाच नेपोलियन किंवा एखादाच शेक्सपियर किंवा कालिदास एखादाच ल्युथर किंवा शंकराचार्य, एखादाच मोरोपंत युगांतराने जन्मास येतो."[६]

काव्यप्रयोजन:
==========

मम्मटाने सांगितलेली काव्याची प्रयोजने सुप्रसिध्दच आहेत. त्यांच्या मते यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभविवारण, कांतासंमित उपदेश आणि उच्च आनंद अशी सहा प्रयोजने सांगितलेली आहेत. काव्यप्रयोजन सांगताना काव्याचा उद्देश मनोरंजन आहे, काव्यमर्मज्ञता हे आनंदाचे मोठे साधन आहे असे चिपळुणकर सांगतात. करमणूक हा सुध्दा साहित्याकडून पदरात पडणारा गौण त-हेचा लाभ आहे असे त्यांना वाटते.

आजच्या विज्ञानयुगामध्ये "अशुभविवारण" हे काव्यप्रयोजन संपुष्टात आलेले आहे, असे दिसून येते. तरीपण चिपळुणकरांनी "काव्य यशासे" असे एक काव्यप्रयोजन सांगितलेले आहे. परंतु अनेकदा लेखकांना जी प्रसिध्दी मिळते ती वाङ्.मयीन कारणामुळेच असे नसून कित्येकदा त्याला वाङ्.मयबाह्य कारणे-ही असतात असा विचार त्यांनी मांडलेला आहे. "दशकुमारचरिता"ला युरोपातील संस्कृत तज्ज्ञांत जी प्रसिध्दी मिळाली तिचे कारण विल्सनने तो संपादित केला. इतकेच. मुंबई इलाख्याचे शिक्षणाधिकारी ग्रँट यांच्या

पुरस्कारामुळे तुकाराम सा-या मराठी कवीत अग्रगण्य ठरला. याचा अर्थ असा नव्हे की, तुकारामात कवित्वगुण नाहीत, पण ग्रँटनी त्याला मान्यता आणली. आमच्याकडे मुद्रणकला अज्ञात असल्यामुळे उत्कृष्ट कवींची तेवढी कृती मागे राहिली बाकीचे सामान्य लेखक पार विस्मृतीत गेले असे चिपळूणकरांचे विवेचन आहे.

## कवीस आवश्यक गुण: सहृदयता:

सर्वसामान्य माणूस आणि कवी यांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक बाबतीत मूलभूत भेद दिसून येतो. "विद्वत्त आणि कवित्व" या निबंधात चिपळूणकर म्हणतात, "इतर मनुष्यांत व कवीत मुख्य विशेष म्हणजे कवीच्या ठिकाणी आत्यंतीक स-हृदयता असते. स-हृदयता म्हणजे अंत:करणाचा कोमलपणा. हा अंत:करणाचा कोमलपणा तरुण वयात मनुष्यास फार असतो, व तसाच अज्ञानावस्थेत असणा-या राष्ट्रातही फार असतो. म्हणूनच लहान वयात अंत:करण वृत्ती सुक्षोभ असून नाटके, कादंब-या, काव्ये अशा ग्रंथांचा अतोनात नाद लागतो. आणि राष्ट्राच्याही आद्यावस्थेमध्ये उत्कृष्ट कविता उदयास येते. पण या सौम्यवृत्ती मनुष्यात व राष्ट्रात प्रौढ वयाच्या सुमाराव मावळू लागून शेवटी बहुदा नाहीशा होतात व त्याप्रमाणे विचारशक्तीचे प्राबल्य होत जाऊन कवित्वाचा -हास होतो."[७] येथे चिपळुणकरांनी मांडलेला मुद्दा म्हणजे प्रौढ वयामध्ये व राष्ट्राच्या प्रौढ अवस्थेत विचारशक्ती वाढत जाते. त्यानुसार लहान वयातील सहृदयता कमी होते व शेवटी कवित्वशक्तीचा -हास होतो. परंतु चिपळुणकरांचे हे काव्यासंबंधीचे विचार पटण्यासारखे नाहीत. कारण प्रौढ वयामध्येही कवित्वाचा साक्षात्कार झालेला कितीतरी व्यक्ती सापडतील. वि.द. घाटे यांच्या आपल्या "अवघे पाऊणशे वयमान" या पाठामध्ये तर वयाच्या ७५व्या वर्षी काव्यस्फूर्ती झाल्याचा उल्लेख पहावयास मिळतो.

यावरून असे म्हणता येईल की, वयानुसार विचारशक्तीचे प्राबल्य वाढत जाऊन कवित्वगुणाचा ऱ्हास होतोच असे नाही, तर त्याचा विकासही होऊ शकतो.

चिपळुणकरांनी काव्यनिर्मितीच्या बाबतीत जाणवलेला खेद व्यक्त केलेला आहे. ते म्हणतात, "जुन्या कवींच्या सृष्टीचा व मानवी स्वभावाच्या केवळ मूळच्या स्वरूपाशी त्यांचा नेहमी परिचय असे. आताप्रमाणे दोहोवर त्याकाळामध्ये कृत्रिमता आली नव्हती. त्यामुळे निसर्गातील प्रतिमा कवींच्या मनावर सहज ठासून ती वर्णनाद्वारा त्याच्या ग्रंथामध्ये प्रकट होई. पण पुढील कवींच्या मनावर ती अर्थातच पहिल्याप्रमाणे यथास्थित न उमटल्यामुळे स्वभाववर्णन त्यांस पूर्वीप्रमाणे जमलेले नाही असे होता होता शेवटी तर स्वभाववर्णन अगद च सुटून कविता केवळ सामान्य व्यावहारिक कलेप्रमाणे गण-मात्रा जुळविण्याचे काम होऊन बसली. जुने कवी स्वानुभूत गोष्टीचे व मनो-वृत्तीचे वर्णन करीत. पण पुढील काळी कीर्तीच्या किंवा पैशाच्या लोभास्तव जेव्हा काव्य करण्याचा रिवाज सुरु झाला किंवा कविता करणे हा एक धंदाच झाला तेव्हा स्वानुभव हा कवीस नकोसा झाला. कवितेस स-हृदयतेपेक्षा बुध्दीची व मेहनतीचीच विशेष गरज भासू लागली. म्हणजे पूर्वीच्या कवितेचे जे साधे अर्थसौंदर्य जाऊन त्याजागी मोठमोठी मजेदार वृत्ते, पदांचे लालित्य व माधुर्य, अर्थालंकार, शब्दालंकार असा थाटमाट हळू-हळू आला."[७]

## कवितेच्या तीन अवस्था:

"कविता" या नावाने लिहिलेल्या तीन लेखात प्रथम त्यांनी कवितेच्या तीन अवस्थांचे विवेचन केले आहे. पहिली अवस्था म्हणजे अत्युत्तम अवस्था होय. या प्रकारामध्ये केवळ अंत:करणाचे स्वाभाविक उद्गार असून त्यावेळेस

शब्दाचे बाह्यालंकार मुळीच नसतात. तरीदेखील तिचे साधे शुध्द स्वरूप त्यावेळेस फारच रमणीय दिसते. सायंकाळच्यावेळी देवा-यामध्ये मंदपणे जळणा-या समईप्रमाणे ही कवितेची पहिली सात्विक व शांत असते. दुसरी अवस्था म्हणजे अंत:करण स्फूर्ती असून कवितेस बाह्यालंकाराचेही साहित्य असते. तर तिसरी अवस्था म्हणजे यामध्ये ह्दयद्रावक गुण काहीच नसून केवळ अलंकारादिकांचा भरणा मात्र कवितेत केलेला दिसून येतो. याबाबतीत चिपळूणकर म्हणतात, "ज्या पद्यात यमकांची, प्रासांची वगैरे खूप रेलचेल असेल ती उत्कृष्ट कविता. ही परीक्षा म्हणजे स्त्रियांचे रूप त्यांच्या अंगा-वरच्या दागदागिन्यांवर लेखण्यासारखी होय." असे मार्मिक उदाहरण देतात.

काव्यकारण:
=========

प्रतिभाशक्ती हेच काव्यनिर्मितीचे प्रमुख कारण मानले गेलेले असले तरी प्रतिभावान कवीलासुध्दा कोणत्याही क्षणी हुकुमी काव्यनिर्मिती करता येईल असे नाही. त्यासाठी कवीच्या सुप्त मनामध्ये तयार होत असलेल्या रसाचा सहज असा उद्रेक व्हावा लागतो. म्हणजेच स्फूर्ती होय. विद्वत्त्व कवित्वास सहाय्यक होते हे चिपळूणकरांनी "शालापत्रका"तील "इंग्लिश कविता" ह्या लेखात मिल्टनवर लिहित असताना व्यक्त केले आहे. पण पुढे चिपळूणकरांचे मत बदललेले दिसते.

"विद्वत्व आणि कवित्व" या निबंधात काव्यकारण सांगताना प्रतिभा हे ईश्वरी देणे आहे. दांडगाईने कवी होता येत नाही. कवित्वास विद्वतेची अगदी गरज नाही. कवित्व हे ओढून ताणून मिळविता येत नाही. ते ईश्वरी देणे आहे. जसे सौंदर्य, सुस्वर इ. मानवाच्या अस्वाधीन असणारे गुण मुद्दाम मिळविण्याचा प्रयत्न केल्यास जेवढे यश मिळेल तितकेच जबरदस्तीने

कवी होणाऱ्यांना मिळू शकेल. Poets are born and not made. यासाठी चिपळूणकरांनी आपल्या "विद्वत्व आणि कवित्व" या निबंधाच्या तळटीपेमध्ये एक मार्मिक उदाहरण दिलेले आहे. ते म्हणतात, "ओढून ताणून शब्दांची जुळवाजुळव करणारा मनुष्य सरस्वती ज्यास प्रसन्न आहे अशा महाकवीशी जर स्पर्धा करू लागला तर आज उद्या मडकी घडणाऱ्या कुंभाराला व त्रीभुवनास ज्याने निर्माण केले त्या ब्रह्मदेवाचाही कलह लागेल, कोणी सांगावे ।"[९]

काळ हा देखील काव्यनिर्मितीला प्रेरक ठरू शकतो. याबद्दलही चिपळुणकरांनी अनेक उदाहरणांनी पटवून दिलेले आहे. मोठमोठ्या लढाया, राज्यक्रांत्या वगैरे लौकिक घटनांनी उभ्या राष्ट्रात खळबळ माजते व यावेळी वक्तृत्व, कविता, इतिहास यांचा उदय होतो. असे त्यांचे म्हणणे आहे. इलियड, रामायण, महाभारत यांच्या निर्मितीत लढायांनी प्रेरणा दिली आहे. त्यामध्ये असणारी संघर्षाची भावना, आदर्श जीवनमूल्ये, त्यागी वृत्ती, कमालीची कपटवृत्ती, वीरकरुण रसांचे मिश्रण या अनेकविध अंगानी ही महाकाव्ये सजली आहेत. आजही ती काळाच्या ओघामध्ये टिकून आहेत. विज्ञानयुगामध्ये वावरत असतानादेखील आजही रामायण महाभारत मोठ्या आदराने आणि जिज्ञासेने टी.व्ही.वर पाहात असतो. त्याचा आस्वाद घेत असतो. कारण त्या एक मानवी कलाकृती आहेत आणि मानवी अनुभूतीतून उतरलेल्या आहेत. शिवाय शोकात्मिका आहेत. शेक्सपियरला तर "रोझेस"च्या म्हणजे राजकीय घराण्यातील भाऊबंदाच्या भयानक लढायांनी स्फूर्ती आणि काव्यनिर्मिती झाली.

स्वातंत्र्यकाळामध्येही देशावर प्रेम करणाऱ्या वीरांनी उदा. सावरकर सारख्या प्रतिभावान कवीनी जनतेमध्ये स्फूर्ती निर्माण होईल, आत्मसमर्पणाची

आणि अस्मितेची भावना उरी बाळगून काव्य लिहिले. ही त्या काळाचीच देणगी म्हणावी लागेल. अशा देशाभिमान जागृत ठेवणा-या व क्रांतिकारक वृत्ती तयार करणा-या कविता निर्माण करण्यापाठीमागे त्यावेळच्या काळच व कविचा पिंडच प्रेरक ठरलेला दिसतो. हे लक्षात घेता राजकीय, सामाजिक परिस्थितीत तत्कालीन वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा असतात, हा चिपळुणकरांचा विचार महत्वपूर्ण ठरतो.

रसविचार:

संस्कृत साहित्यशास्त्रामधील रसव्यवस्थेचा विचार करता आपणास असे दिसून येईल की, भरतमुनींनी मूळात आठ रस सांगितलेले आहेत. त्याचप्रमाणे कालिदास नाटयप्रयोगाच्या संदर्भात "अष्टारसाश्रयप्रयोग" असा आठच रसाचा उल्लेख करतो. दण्डीनेही याला पाठिंबा दिलेला आहे असे दिसून येते.

रसविचार करीत असता शृंगार, वरी, करूण इत्यादी रसांना संस्कृतमध्ये वाचक शब्द आहेत. परंतु The Sublim या रसाचा वाचक शब्द संस्कृतमध्ये नाही. त्यासाठी चिपळुणकर उदात्त रस किंवा कल्पनाशालित्व असा प्रतिशब्द तयार करतात. हा रस कालिदासाच्या काव्यामध्ये विशेषत्वाने आढळतो. रसानुभवाची लक्षणे चिपळुणकर पुढीलप्रमाणे सांगतात. सहृदयालाच रसानुभव येतो, शहारून जाणे, गहिवरून येणे, देहभान विसरणे इ. सर्व लक्षणे जो सहृदय असेल त्यांच्या ठिकाणीच दृष्टीस पडतील. हा चिपळुणकरांचा विचार आजदेखील पटण्यासारखा आहे. केवळ पांडित्याच्या जोरावर अत्युत्कृष्ट काव्याचेही रमणीयत्व कळून येणार नाही. तर त्याला स्वानुभवाची, सहृदयतेची जोड हवी.

कवीचे व्यक्तिमत्त्व:

चिपळुणकरांनी काव्यविचाराबरोबरच कवीच्या व्यक्तिमत्त्वाला

आवश्यक असणाऱ्या गोष्टीचाही विचार केलेला आहे. कवीजवळ सहृदयता हवी. निसर्गाच्या ज्या ज्या गोष्टीचे तो वर्णन करतो त्यामध्ये यथातथ्यता असावी. तसेच ज्याचे वर्णन करावयाचे त्यास साक्षात अनुभव असावा. पदलालित्य, मृदुत्व, सरळ अन्वय, व्याकरणशुध्दता, छंदाची निर्दोष व्यवस्था इ. गोष्टी गौण होत. कारण या गोष्टी नसल्याने काव्याची शोभा कमी होते किंवा या गोष्टी असल्याने काव्याची शोभा वाढते असेही नाही. चिपळुणकरांची ही कवी आणि कवितेबद्दलची भूमिका आधुनिक कवींच्या काव्यविचारांशी सांधेजोड करणारी वाटते.

पंडित आणि अडाणी यांची भाषा परस्परास भिन्न असली तरी त्या दोहोपैकी कोणाची योग्यता कमी होत नाही. समाजात भाषेचे वेगवेगळे थर, असायचेच. आपल्या अहिराणी बोलीमध्ये सहजपणे मनाची व्याख्या करणारी अशिक्षित बहिणाबाई ही मनाचा शोध घेणाऱ्या शास्त्रज्ञा-पेक्षा श्रेष्ठ वाटते. काव्यरचना सर्वास समजण्यासारखी करावयाची सोडून मा मोरोपंतानी एवढे मोठे मोठे संस्कृत शब्द, लांब लांब समास वगैरे योजून त्यास दुर्बोधता का आणली ? या प्रश्नाला स्वीपरत्वे जगात हरएक प्रकरणी कृतीभेद आढळतो. हे सर्वप्रसिध्द आहे."[१०] असे चिपळुणकरांचे उत्तर आहे.

जुन्या कवींची काव्ये उत्कृष्ट उतरण्याची कारणे चिपळुणकरांनी पुढील-प्रमाणे दिलेली आहेत. एक तर ~~तर~~ त्याकाळी कल्पनेचे मोठे प्राबल्य असल्या-मुळे ते त्या कवींच्या कवित्वास अत्यंत पोषक झाले. दुसरे बाह्यसृष्टीचे मुळचे शुध्द स्वरूप त्यांच्या नेहमी दृष्टीस पडल्यामुळे त्यांच्या कृत्रिम, संस्काररहित शुध्द मनावर "रंग: शुक्लपटे यथा" या न्यायाने त्यांचा ठसा सहजपणे पूर्ण उमटला. तिसरे कारण अर्थात उघड आहे की, त्या कवीच्या मनोवृत्ती व हृदयवृत्ती केवळ स्वानुभूत असल्यामुळे अविर्भाव तसाच यथास्थित व स्पष्ट

त्यांच्या ग्रंथात झाला. ज्याने दु:ख, वियोग कधी अनुभवले नाही त्या व्यक्तिने पुत्रशोकादिकाचे वर्णन केल्यास, ज्याचा काळ ऐषआरामात जाणार त्याने युध्दहि प्रसंग वर्णिल्यास ते किती उत्कृष्ट ठरेल ? तेव्हा वर्णन करावयाच्या गोष्टींचा कवीला अनुभव हवा.

काव्यानंदमीमांसा:
=============

काव्यास्वादाचे स्वरुप स्पष्ट करताना चिपळुणकर म्हणतात, "ज्यास सह्रदयत्व म्हणून आहे त्यास त्याचा साक्षात अनुभव घडून, ते ते प्रसंग जसे काय प्रत्यक्ष डोळ्यापुढे उभे रहातात आणि चित्तवृत्ती जणू काय मंत्रमुग्ध होऊन, तन्मय होऊन जाते. बाह्यसृष्टीचे भान नाहिसे होऊन नाटकातील त्या त्या पात्राशी वाचक किंवा प्रेक्षक तादात्म्य पावतात." या तादात्म्याचे उदाहरण देताना "शाकुंतल"च्या चौथ्या अंकावर ज्यांची टिपे पडली नाहीत, असा कोण आहे ? असा चिपळुणकरांचा प्रश्न आहे.

या पूर्ण तादात्म्याची चिपळुणकरांची कल्पना पटत नाही. कारण सर्वच रसिक असे टपा-टपा अश्रु गाळतील असे म्हणता येणार नाही. रसिक जेव्हा एकीकडून कलाकृतीशी तादात्म्य पावत असतो त्याचवेळी दुसरीकडून त्याची भूमिका तटस्थपणाचीही असते. जर रसिक कलाकृतीशी पूर्ण तादात्म्य झाले तर प्रत्यक्ष दु:ख आणि वाङ्मयीन पातळीवरील दु:ख यात भेद तो काय राहणारच नाही.

रीतिविचार:
==========

प्रत्येक लेखकाची शैली वेगवेगळी असते. रीती म्हणजेच शैली. चिपळुणकरांनी रीतीबद्दल "भाषापध्दती" हा स्वतंत्र निबंधच लिहिला आहे व

भाषापध्दतीचे गुण स्पष्ट केले आहेत. ते पुढीलप्रमाणे- १) शुध्दता, २) साधेपणा, ३) सुबोधत्व हे होत. चिपळुणकरांच्या मते व्यावहारिक भाषा व काव्याची भाषा या भिन्न असाव्यात. पण पुढे म.मो. कुंटे यांनी "राजा शिवाजी" हे वीररसप्रधान काव्यामध्ये दैनंदिन जीवनातील भाषेचा वापर केलेला आहे.

समारोप:
======

"विद्वत्व आणि कवित्व" हा शुध्द वाड्.मयीन निबंध चिपळुणकरांच्या वाड्.मयीन चिंतनाची साक्ष देतो. चिपळुणकरांनी संस्कृत, मराठी इंग्रजी साहित्याचे रसनिष्ठ वृत्तीने अध्ययन केले असल्यामुळे साहित्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी आस्वादकाची व अभ्यासकाची बनली असल्यास आश्चर्य नाही. "निबंधमाले"तील निबंधाची सुरुवात ते संस्कृत सुभाषिताने करतात. अनेक रसपूर्ण, समर्पक, अर्थयुक्त सुंदर अवतरणे त्यांच्या रसलुब्ध मनाची साक्ष पटवितात. वाड्.मयीन विषयांवर चिपळुणकरांपूर्वी सुदीर्घ असे लेखन कोणी केले नव्हते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यचिंतनातून प्रकट झालेल्या समीक्षणात्मक लेखनाला महत्त्व येऊन त्या लेखनाची परंपरा मराठीत सुरु करण्याचे श्रेय त्यांना मिळाले. वाड्.मयाच्या आकाशामध्ये चिपळुणकरांचे निबंधकार म्हणून ध्रुवता-याप्रमाणे अढळ स्थान आहे.

पांडित्याचा आणि कवित्वाचा काही परस्पर संबंध आहे काय ? या दृष्टीकोणातून त्यांनी कित्येक वर्षांपूर्वी केलेले विवेचन आजदेखील महत्त्वपूर्ण ठरते. त्यांची कांही मते ग्राह्य वाटतात. तर साहित्यातील काही प्रश्न चिकित्सकांना आव्हान देत राहातात. उदा. वैज्ञानिक युगामध्ये काव्य क्षीण होत जाते की काय ? असा प्रश्न आजही कधी कधी चर्चेसाठी आलेला

दिसतो. परंतु आपणास असे दिसून येते की, वैज्ञानिक प्रगतीमुळे भौतिक क्षेत्रामध्ये आश्चर्यकारक प्रगती व बदल दिसून येतो. त्यामुळे काव्याची पीछेहाट तर झालीच नाही उलट नवे नवे विषय नव्या नव्या जाणिवा अविष्कृत झाल्या आहेत. त्यामुळे चिपळुणकरांचे मत न पटणारे आहे.

चिपळुणकरांनी स्वत:ला "मराठी भाषेचे शिवाजी" म्हणून घेतले आहे. अर्थात त्यावेळच्या शिक्षितांच्या लकबीनुसार त्यांनी हे उद्गार इंग्रजीत काढले, हा भाग वेगळा. ते उद्गार चिपळुणकरांच्या बाबतीत सार्थ वाटतात. कारण हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवाजी महाराजांनी जे मोलाचे कार्य केले त्याचप्रमाणे पारतंत्र्याच्या काळामध्ये आपल्या भाषा संस्कृतिचा तिरस्कार करणाऱ्या लोकांना धडे शिकविण्यासाठी व एतद्देशीयांमध्ये देशाभिमान राष्ट्रजागृती करण्यासाठी चिपळुणकरांनी केलेले वाङ्मयीन क्षेत्रामधील कार्य फार महत्त्वाचे आहे.

एकंदरित चिपळुणकरांच्या काव्यविचारांतील विवेचनातील ग्राह्य भाग एवढाच मानता येईल की, जड तर्ककठोर, रूक्ष पुस्तकी पांडित्य कवित्वाला प्रतिकूल आहे. काव्य हे जिवंत अनुभूतीतून प्रकट होते. जो जात्याच कवी आहे तो विद्वानही असेल. उदा. कालिदास, जगन्नाथराव, मिल्टन, बायरन इत्यादी किंवा कवी असतील पण विद्वान नसतीलही उदा. शेक्सपिअर, तुकाराम, बर्न्स इ. पण जितकी विद्वता अधिक तितके कवित्व अधिक असे म्हणणे चूक होईल, असे चिपळुणकर म्हणतात.

कवित्व ही निसर्ग, अंतस्फूर्त, सर्जनशील प्रवृत्ती आहे. याची जाणीव चिपळुणकरांनी करून दिली. ही मराठी काव्य विचारात त्यांनी घातलेली महत्वाची भर होय.

.....

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | देशपांडे, सुधाकर शंकर, | : "माला"कार चिपळुणकर, मॅजिस्टिक बुकस्टॉल, गिरगाव नाका, मुंबई-४. प्रथम आवृत्ती मे, १९८५. |
| २ | तत्रैव, | : |
| ३ | तत्रैव, | : |
| ४ | चिपळुणाकर, बि.कृ, | : निबंधमाला, पृ. ३०. |
| ५ | तत्रैव, | : तत्रैव, तळटीप, पृ. ४३. |
| ६ | बापट, गोपाळ वामन, | : काव्य व कवि, विविधज्ञानविस्तार, पु. ५०, अंक ७, पृ. २२५. |
| ७ | चिपळुणाकर, विष्णु कृष्णा, | : निबंधमाला, पृ. ४४. |
| ८ | तत्रैव, | : पृ. ४५. |
| ९ | तत्रैव, | : पृ. ३६. |
| १० | देशपांडे, सुधाकर शंकर, | : "माला"कार चिपळुणकर. |


.......

# स मा रो प

एकोणिसाव्या शतकाचा वाङ्•मयीन कालखंड हा नव्या जुन्याचा संधिकाल आहे• हे नव्या वाङ्•मयाच्या पूर्वतयारीचे युग आहे• मराठी-मधील नव्या वाङ्•मयप्रकाराची बीजे या काळात रुजलेली दिसून येतात• कविता, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र इत्यादी ललित वाङ्•मयच नव्हे तर नियतकालिके, निबंध, भाषांतरे, चरित्रे, टीका इत्यादी वाङ्•-मयप्रकारांचा व लेखन प्रकारांचाही खराखुरा उन्मेष याच कालखंडात झाला, असे दिसून येईल• "इंग्रजी राजवटीमुळे तसेच इंग्रजी वाङ्•मयाच्या अभ्या-सामुळे आणि परिचयामुळे मराठीतील वाङ्•मयनिर्मितीला जोराची गती व नवी दिशा मिळाली• काही नवीन वाङ्•मयप्रकारांचीही मराठी वाङ्•मयामध्ये भर पडली• उपरोक्त वाङ्•मय प्रकारांप्रमाणेच प्रवासवर्णन व्याकरण, शब्दकोष, वाङ्•मयकोष इत्यादी वाङ्•मयप्रकार व भाषा-लेखन-विषयक साधनसामग्री यांचाही विकास होत होता•

चिपळूणकरांसारख्या प्रभावी निबंधलेखकाच्या वैचारिक लेखनाची पूर्वतयारी, किर्लोस्करांची नाटके, हरिभाऊ आपटे यांचे कादंबरीलेखन आणि केशवसुतांची नवीन कविता ह्या सर्व युगप्रवर्तक वाङ्•मयनिर्मितीची पूर्वतयारी या कालखंडात झाली होती• या दृष्टीने पाहता इंग्रजी राज-वटीचा काळ भावनेपेक्षा बुध्दीवर, आध्यात्मिकतेपेक्षा भौतिकतेवर भर देणा-या, ऐहिकतेला प्राधान्य देणारा होता• उपयुक्त ज्ञानाचा प्रसार हे या काळातील विचारवंताचे ब्रीद होते•

"नावल व नाटक" हा वाङ्•मयविषयक विचार मांडणारा कालदृष्टया मराठीतील पहिला निबंध म्हणता येईल• एकोणिसाव्या शतकातील बदलू पाहणा-या वाङ्•मयविषयक जाणिवेचे पहिले उन्मेष त्यात आढळतात• असे उन्मेष तत्कालीन कादंब-या, नाटके यांना

लिहिलेल्या प्रस्तावनातूनही प्रकट झाले आहेत.

इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने काव्यविषयक नवी जाणीव तरुण सुशिक्षितांत निर्माण झाली. भारतीय साहित्यशास्त्राला धरून असणा--या पारंपरिक काव्यविषयक जाणिवांत आता बदल होऊ लागला. पाश्चात्य काव्यादर्श आमच्या अभ्यासकांपुढे असल्याने त्यांचा स्वीकार व पुरस्कार आणि त्यानुसार काव्यविषयक व काव्यरचना मराठीत रूढ होऊ लागली. एकोणिसाव्या शतकात मराठीतील काव्यविचार कसकसा विकसित होऊ लागला त्याचा शोध आतापर्यंतच्या विवेचनातून घेतला आहे.

"यशोदापांडुरंगी"च्या प्रस्तावनेमधून दादोबांचे काव्यविचार प्रकट झाले आहेत. परंपरेवरील भक्ती आणि नावीन्याची प्रीती या दोन सनातन प्रवृत्ती आहेत. या काळातील पहिली प्रातिनिधिक परंपरा "पंडित कवी"ची होय.दादोबा प्रस्तावनेमध्ये मोरोपंतांची भक्ती व रामजोशींची प्रीती हे विशेष निदर्शनास आणून देतात. मोरोपंत व वामनांनी मराठी भाषेस संस्कृत भाषेसारखा प्रौढपणा प्राप्त करून दिला हे त्यांना महत्त्वाचे वाटते. मोरोपंतांची कारुण्य आणि वीर इत्यादी रसांनी युक्त आहे. त्यांची वाणी अधिक शुध्द व रसभरित आहे. त्यांच्या काव्यात रस, अलंकार, प्रास आणि यमके यांना प्राधान्य मिळाले; कवितेतील -हस्वदीर्घत्व पंतांनी टिकविले हे दादोबांना विशेष महत्त्वाचे व उल्लेखनीय वाटते. मोरोपंतांच्या यमक साधण्याच्या चातुर्याचा ते गौरव करतात. यमक, प्रास, व अलंकार हे कवितेचे बाहयांग तर रसात्मकता हे अंतरंग अशा दोन्ही अंगांनी दादोबांनी कवितेचा विचार केला आहे.

संस्कृत साहित्यशास्त्राचे या निकषाधारे काव्यपरीक्षण करण्याची पध्दती रूढ करण्याचे श्रेय गुंजीकरांकडे जाते. तत्कालीन समीक्षेला अनुसरून गुंजीकरांनी नीतिबोध हे साहित्याचे सर्वप्रथम प्रयोजन मानले आहे. अलंकारिकतेला गुंजीकरांनी दुय्यम स्थान दिले आहे. "ज्याचा अस्वाद विनासायास घेता येतो ते 'द्राक्ष' काव्य त्यांनी 'सर्वोत्कृष्ट' मानले आहे. कालिदासाची काव्य आणि आर्य कवीचे रामायणादी ग्रंथ त्यांच्या दृष्टीने अप्रतिम काव्ये ठरतात प्रास, यमक, श्लेष, कूटे ही त्यांनी दुय्यम व गौण मानली आहेत. तर सरळपणा व सोपेपणा ह्या त्यांच्या मते, काव्याच्या प्राथमिक गरजा आहेत. काव्य हे वाचताक्षणीच वाचणा-याच्या अंत:करणामध्ये "एककालीन अप्रतिम आल्हाद" उत्पन्न करीत असते. त्याच्या अर्थाकरता पुन्हा अन्वय शोधीत बसण्याची गरज नसते. सारांश, द्राक्षासारखी मधुर व वाचताक्षणीच माधुर्याचा प्रत्यय देणारी कविता हीच गुंजीकरांच्या मते, खरी कविता होय. पद्याच्या भाषेत आणि व्यवहारिक भाषेत फरक असणे हे गुंजीकरांना उणेपणा वाटतो. शब्दपांडित्यालाच कवित्व मानण्याचा बहुतेक लोकांचा कल असतो. अशी तक्रार गुंजीकर करतात. नेमकी हीच रूढी मोडण्याचे धैर्य म.मो. कुंटे यांनी आपले "राजा शिवाजी" लिहिताना दाखवले आहे. त्याबद्दल गुंजीकरांनी त्यांचे अभिनंदनही केले आहे. "राजा शिवाजी"ला कुंटे यांनी लिहिलेली प्रस्तावना ही मराठीतील काव्यविषयक नव्या जाणिवेची प्रभात होय. म.मो. कुंटे यांचा "राजा शिवाजी" या काव्यलेखनाचा प्रयोग अभिनव आहे. जुन्या मोरोपंती वळणाच्या आख्यानकाव्यापेक्षा आमूलाग्र नवीन कविता त्यांनी लिहिली. समाजातील अशिक्षित व सुशिक्षित यांच्यामधील वैचारिक दरी दूर करणे कुंटे यांना आपले कर्तव्य वाटले. अभिरूचीनुसार वाचकांचे त्यांनी तीन वर्ग केलेले आहेत.

१) शास्त्रांचा सर्वात मोठा वर्ग, २) सुशिक्षित-इंग्रजी जाणणारांचा वर्ग, ३) अशिक्षित - श्रमजीवी वर्ग.

"आपल्या आकलनशक्तीला बाधा न येऊ देता भावनांना जी हलवून सोडते ती कविता." अशी कुंटे यांनी कवितेची व्याख्या केली. कवितेचे यशापयश हे वाचकाच्या अभिरुचीवर व भावनेवर अवलंबून असते. शास्त्री लोक आपल्या काव्यामध्ये विचारापेक्षा अलंकार, छंदोबध्द रचनेलाच जास्त महत्त्व देतात, यावर कुंटेयांनी प्रकाश टाकलेला आहे. आणि अशिक्षित वर्गापर्यंत जर कविता जावयाची असेल, तर ती त्यांच्या नेहमीच्या व्यवहाराच्या भाषेतच लिहायला पाहिजे, असे सांगितले. काव्य-विषयक असा विचार देणारे कुंटे हे मराठीतील पहिले साहित्यिक होत. असा नवा विचार त्यांनी मांडलाच पण प्रत्यक्ष "राजा शिवाजी" या काव्यातून तो कृतीत उतरवूनही दाखविला. अर्वाचीन मराठीमध्ये महाकाव्यासबंधी कुंटे यांनी मांडलेले विचार हे मूलभूत स्वरूपाचेच आहेत. त्याचे विशेष त्यांनी पुढील प्रमाणे सांगितले आहेत.

१) महाकाव्य हा वाङ्मयप्रकार शोकात्मिका, भावकाव्य व सुखात्तिका इ. सर्व वाङ्मय प्रकारांपेक्षा भिन्न आहे.

२) महाकाव्यामध्ये सर्व राष्ट्रांचा उगम, विकास व लय दाखविलेला असतो. सर्व भावभावनांचे आविस्करण त्यात अंतर्भूत असते. वात्सल्यापासून ते रम्याद्भुतापर्यंत सर्व भाव त्यामध्ये असतात. तसेच सर्व निसर्गदृश्यांचे वर्णन त्यामध्ये असते. इत्यादी.

कुंटेयांच्या मते, कोणत्याही काव्यामध्ये कथानक महत्त्वाचे असते. कारण ख-या काव्याचे लक्षण म्हणजे नवीनता आणि कथानकाची रचना करणे व मनाला उच्च स्तरावर नेणे हे आहे. "शैली"बद्दल लिहिताना कुंटे म्हणतात की, स्वच्छंदतावादी आणि अभिजात या दोन शैली (त्यावेळी) मान्यता पावलेल्या आहेत. या लेखनपध्दतीचा उगम निसर्गात असावा. खरी कला ही निसर्गाचे अनुकरण करते, असेही कुंटे स्पष्ट करतात.

मराठी शब्दांचा असा उच्चार केला जातो, तसे ते लिहिले जात नाहीत आणि जोपर्यंत या दोहोंमधील फरक नष्ट होत नाही, तोपर्यंत मराठी छंदरचनेत त्रुटीच राहतील. हा फरक लक्षात घेऊन कुंटेयांनी आपल्या प्रस्तुत कवितेत शब्द जसे उच्चारले जातात तसे निर्भयपणे योजले व काव्यलेखनाचा नवा आदर्श निर्माण केला. यावरून व्यवहाराची भाषा व काव्याची भाषा एक करण्याचा प्रयत्न कुंटे यांनी मोठ्या धाडसाने केला आहे. आणि तो फार तोलामोलाचा आहे.

चिपळूणकरांचा काव्यविषयक विचार विशेषरूपाने प्रकट झाला आहे. तो "विद्वत्त्व आणि कवित्व" या निबंधातून चिपळूणकरांच्या मते कवित्वाला स-हृदयता हवी, शृंगार, वीर, करुणादी नानाविध वृत्ती त्यास सूक्ष्मपणे व स्पष्ट जाणवल्या पाहिजेत. वरील वृत्तीचा विषय इंद्रियगोचर होताच कवीचे मन क्षुब्ध होऊन जाते. आणि त्या खळीसरसे उद्‌गार आपोआप निघून जातात तीच खरी अस्सल कविता होय, अशी काव्याचा उद्‌देश मनोरंजन आहे, काव्यमर्मज्ञता हे आनंदाचे मोठे साधन आहे. करमणूक हासुद्धा साहित्यांकडून पदरात पडणारा गौण त-हेचा लाभ आहे, असे काव्यप्रयोजनाचे स्वरूप त्यांनी विशद केले आहे.

काव्याच्या तीन अवस्था चिपळूणकरांनी मानल्या आहेत. यामध्ये पहिली अवस्था म्हणजे अत्त्युत्तम अवस्था होय. या प्रकारांमध्ये अंत:करणाचे केवळ स्वाभाविक उद्‌गार असून त्यावेळेस शब्दांचे बाह्यावडंबर मुळीच नसते. दुसरी अवस्था ही अंत:करण स्फूर्ती असून कवितेस बाह्यालंकाराचेही साहित्य असते. आणि तिसरी अवस्थेमध्ये हृदयद्रावक गुण काहीच नसून केवळ अलंकारादिकांचा भरणा मात्र कवितेत केलेला असतो. काव्यकारण सांगताना चिपळूणकरांनी प्रतिभा हेच ईश्वरी देणे आहे

असे सांगून प्रतिभाशक्तीची अलौकिकता स्पष्ट केली आहे. काव्यानंद-मीमांसा करताना चिपळूणकर पूर्ण तादात्म्याची कल्पना मांडतात. एकंदरित चिपळूणकरांच्या काव्यविवेचनातील ग्राह्य भाग एवढाच मानता येईल की, जड, तर्ककठोर, रुक्ष, पुस्तकी पांडित्य कवित्वाला प्रतिकूल आहे. काव्य हे जिवंत अनुभूतीतून प्रकट होते. एकूण दादोबाप्रणीत शब्दा अलंकृती रसबंधतेपासून चिपळूणकरप्रणीत सहृदयतेपर्यंत मराठी काव्यविचाराने केलेली वाटचाल स्थूलातून सूक्ष्मतेकडे, आणि अधिक सखोलतेकडे जाणारी आहे.

.....